**<u>सदर साक्ष नोंदवितांना आरोपी न्यायालयासमक्ष व्ही.सी.द्वारे हजर.</u>**

**<u>नियमित फौजदारी ख. क्र. ४०४/२०२५.</u>**
**निशाणी क्र. ०८/क**
**सरकार वि. सुकदेव तडवी**

**<u>साक्षीदार.</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.०३.</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | नुतन शेखर जैन |
| वय | : | ३२ वर्षे, |
| धंदा | : | रबर स्टॅम्प बनविण्याचे दुकान |
| राहणार | : | शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे. |

**<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. पाडवी यांचेकडूनः</u>**

१. प्रस्तुत घटना दि. २७.१२.२०२४ रोजी सायंकाळी ०७.४५ ते ०८.०० च्या दरम्यान घडली. सदर दिवशी, सदर समयी मी घरी होतो. मला आशिष प्रकाश जैन यांचा फोन आला की, शकुंतला लॉन्स समोर त्यांनी गाडी लॉक केली होती. ते काही कामानिमित्त तेथून बाहेर गेले. त्यांनी सांगितले की, गाडी तेथून चोरी झालेली आहे, गाडी मला सापडत नाही. त्यानंतर गाडीचा जवळपास शोध घेतला. त्यावेळेस मीही आशिष जैन यांचेसोबत होतो. पण, गाडी सापडली नाही.

२. त्यानंतर आशिष जैन यांनी शिरपूर पोलीस स्टेशन येथे त्याबाबत तक्रार नोंद केली. आशिष यांच्या दुचाकीचा क्र. एमएच–१८–एयु–२६७७ असा होता. ती दुचाकी हिरो कंपनीची, एचएफ–डिलक्स चंदेरी रंगाची होती. त्या प्रकरणाबाबत पोलीसांनी मला विचारपूस केली नाही. पण, नंतर त्यांचा मला फोन आला. काही दिवसांनी असे कळाले की, ती गाडी शहादा पोलीस स्टेशन येथे सापडली आहे. काही दिवसांनी त्यांनी तेथून गाडी सोडवून आणली.

सरतपास पूर्ण.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.01.02 16:46:06 +0530

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे. पाटील यांच्यामार्फतः</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, आशिष माझा नातेवाईक आहे. पोलीसांनी माझा असा जबाब घेतला होता की, ती गाडी कुठून गेली व कशी गेली. दिनांक ३१.१२.२०२४ रोजी माझा जबाब नोंदविला. त्यानंतर पोलीसांनी माझा काहीही जबाब घेतला नाही. आशिष जैन हे ज्यावेळेस घरी गाडी घेवून आले त्यावेळेस ती मी पाहिली. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी मला सांगितले की, ही माझी सापडलेली गाडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर माझा व आशिषचा या घटनेसंदर्भात काहीच बोलणे झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर न्यायालयाचे समन्स आल्यानेच मी आलो. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.01.02 16:46:12 +0530

शिरपूर. (श्रीमती पूजा ना. कोकाटे)
दिनांक ०२.०१.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.
**JO Code-2489**